साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–दिगांबर देवरावजी आजबैले
वय:–४० वर्ष, व्यवसाय–शेतमजुरी
राह.सालेभट्टी, ता.भिवापूर, जि.नागपूर.

<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>

१. मी राहूल मेंढूले यांना ओळखतो कारण ते माझ्या गावालीत रहिवासी आहे. मी राहूल मेंढूले यांच्याकझे शेतीचे काम करतो व ट्रॅक्टर चालवितो. घटना दिनांक ०१/०३/२०२२ रोजीची सकाळी ९.०० वाजेच्या सुमारास घडली आहे. सदर घटना ही सालेभट्टी येथे राहूल मेंढूले यांच्या घरासमोर घडलेली आहे. सदर दिवशी राहूल मेंढूले आणि मी ट्रॅक्टरमधुन कडबा खाली करत असतांना आधी झालेल्या शिवीगाळीमुळे भांडण झाले. त्यानंतर मी दवाखाण्यात नेले कारण राहूल मेंढूले याला अनिल रावजी शेरकी याने डोक्यावर काठी मारली होती. त्यामुळे मार लागला होता त्यामुळे मी त्याला दवाखाण्यात नेले. त्यानंतर राहूल मेंढूले यांच्या डोक्याला टाके पडले. त्यानंतर राहूल मेंढूले याला पो.चौकीमध्ये नेले. त्यानंतर पोलिसांनी माझे बयाण घेतले. ज्याने राहूल मेंढूले याला मारहाण केली होती त्याला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे तो तोच आहे. आरोपीने राहूल मेंढूले याला ज्या वस्तुने मारले ती वस्तु दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला जी.पी.न.८४/२०२३ वरिल एक वेळवाची काठी दाखविली ती तीच आहे त्याला यापुर्वीच **एम.ओ.०१** देण्यात आला.

<u>सरतपास संपला.</u>

<u>आरोपीतर्फे ॲड. श्री.आर.बी.भोंबे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>

२. मी राहूल मेंढूले यांच्याकडे सन २००५ पासुन काम करतो. राहूल मेंढूले यांच्या घराच्या आजुबाजुला बरबटकर, नरूले, नवघरे यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे भाऊ संजय शेरकी व आरोपीचे पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचा भाऊ संजय शेरकी यांच्यासोबत राहूल मेंढूले यांचे चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व राहूल मेंढूले यांचे आपसात पटत नाही. पोलिसांनी माझे बयाण घटनेच्या दिवशीच घेतले होते. मी पोलिसांना दिलेले बयाण वाचुन बघितले होते. दि.०१ तारखेनंतर मी

पो.स्टे.ला बयाण देण्यासाठी गेलो नाही. आता मला माझे बयाण दाखविण्यात आले त्यावर तारिख दि.०२/०३/२०२३ अशी नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे बयाण घेतले होते ते मी खोटे सांगत आहे.

३. मी पोलिसांनी बयाण देतेवेळेस सदरचे भांडण हे आधी झालेल्या शिवीगाळीमुळे झाले होते ही बाब सांगितली नव्हती. पोलिसांनी मला जे विचारले ते मी सांगितले तसेच मी स्वत:हुनसुध्दा पोलिसांना सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, ट्रॅक्टरमधुन कडबा खाली काढत असतांना कडबा खाली केल्यानंतर अस्ताव्यस्त पडलेला असतो.

**प्रश्न–**तुम्ही राहूल मेंढूले याला दवाखाण्यात नेले त्यानंतर तुम्ही परत आले त्यावेळी ट्रॅक्टर तेथेच उभा होता का?

**उत्तर–**होय, साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मी सदर ट्रॅक्टर आत टाकले होते तेथे नव्हते.

४. ज्या वेळेस झगडा भांडण झाले होते त्यावेळेस मी किंवा राहूल मेंढूले यांनी पो.स्टे.ला लगेच फोन केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की,एम.ओ.०१ काडी राहूल मेंढूले यांनीच पोलिसांना दिली होती. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की,सदर काडी स्पॉटवरच पडलेली होती.

५. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने राहूल मेंढूले याला कुठलीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, राहूलचे आरोपीसोबत पटत नसल्यामुळे राहूलने आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की,राहूल हा माझा मालक असल्यामुळे त्याच्याकडुन मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर मी खोटा सांगत आहे व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि१२/०६/२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड